**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद**
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 जून 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 29 जून 2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 09 जुलै 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दिनांकः- 13/07/2020.

विषय:- कोरोना 19 विषाणुमुळे उध्दभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद नगर पालिका क्षेत्रात दिनांक 13/07/2020 रोजीच्या 00.00 वाजेपासुन दिनांक 19/07/2020 रोजीच्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये लागू करण्यात आलेल्या संचारबंदी कालावधीत किराणा दुकानांची चालू राहण्याची वेळ निश्चित करणेबाबत.

**आदेश :-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी कोरोना विषाणू कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. 4 वरील आदेशान्वये शासनाने संपुर्ण राज्यात लॉकडाऊन दि. 31/07/2020 रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत वाढविला असून संदर्भ क्र. 6 अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद नगर पालिका क्षेत्रात कोरोना विषाणू कोविड-19 या विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक 13/07/2020 रोजीच्या 00.00 वाजेपासुन दिनांक 19/07/2020 रोजीच्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये पारित केलेल्या आदेशातील मुद्दा क्र. 1 मध्ये किराणा दुकानांची वेळ चालू राहण्याची वेळ नमूद करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद संदर्भ क्र. 6 चे या कार्यालयाचे आदेशातील मुद्दा क्र. 1 खालीलप्रमाणे वाचण्यात यावा असे आदेशित करीत आहे.

1) सर्व किराणा दुकान सकाळी 9 ते दुपारी 2 या वेळेत चालु राहतील.

सदरील आदेशाची कडक अमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांनी करावी. कुठल्याही व्यक्तींकडुन या आदेशातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच अन्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

सदरचा आदेश आज दि. 13 /07/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
9. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
10. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
11. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत सर्व जि. उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

13/7/20

जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner